# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

## कुलसचिवांचे कार्यालय

एम.आय.डी.सी.रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५, फोन नंबर ०७१३२-२२३१०४

जावक क्रमांक : गों.वि./ 968 /२०१८

दिनांक : ०६.०१.२०१८

प्रति,
मा. प्राचार्य,
संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय** : **''एक भारत श्रेष्ठ भारत''** या अभियातर्गत सांस्कृतिक विचारांची देवाण–घेवाण होण्याच्या दृष्टीने उत्कल संस्कृती विद्यापीठ, ओरिसा येथे आयोजित सात दिवसीय कार्यक्रमात सहभागाबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, **''एक भारत श्रेष्ठ भारत''** या अभियाना अंतर्गत सांस्कृतिक विचारांची देवाण–घेवाण होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र आणि ओरिसा या दोन राज्यांमध्ये सामजंस्य करार करण्यात आला आहे. त्या कराराचा भाग म्हणून उत्कल संस्कृती विद्यापीठ, ओरिसा येथे मार्च–२०१८ मध्ये सात दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. सदर कार्यक्रमात सहभागी होण्याकरिता दि. २०.१२.२०१७ रोजी विद्यापीठास पत्र प्राप्त झाले असून सदर अभियानात लोकगिते, लोकनृत्य, चित्रकला, नाटक, इत्यादी प्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचा समावेश राहणार आहे.

सदर उपक्रमात गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील पदव्यूत्तर शैक्षणिक विभागातील विद्यार्थी/विद्यार्थीनींना सहभागी होण्याच्या दृष्टीने निवड प्रक्रियेचे आयोजन करण्यात आले आहे. ज्यांना सदर कार्यक्रमात सहभाग घ्यावयाचा असेल **त्यांनी निवडीकरिता पदव्यूत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे दि. ०९/०१/२०१८ रोजी दुपारी ०१.०० वाजता** उपस्थित रहावे. जे विद्यार्थी/विद्यार्थ्यांनी सदर निवड प्रक्रियेत भाग घेणार नाहीत त्यांचा कार्यक्रमात सहभागाचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

विद्यार्थी/विद्यार्थ्यांनींनीचा उपक्रमातील सहभाग कार्यक्रम पत्रिकेत ठरवून दिलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाशी संबंधित कौशल्याच्या आधारावर करण्यात येईल. उपरोक्त निवडीची सर्व प्रक्रिया पदव्यूत्तर विभागातील प्राध्यापकांचा समावेश असलेली निवड समितीकडून करण्यात येईल.

(दिपक जुनघरे)
कुलसचिव (कार्य.)